कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२४–२५/९११
दि. २५/०७/ २०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती बाल, महिला व पुरुष कलाकारांच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धा कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात आयोजित करण्यात आल्या असून बाल कलाकारांची राज्यस्तरीय स्पर्धा सोमवार दि १२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता तर महिला कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा मंगळवार दि १३ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता होणार आहे. तसेच पुरुष कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा गुरुवार दि १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापसून निश्चित करण्यात आली आहे.

दि १५ ऑगस्ट २०२४ रोजी पुरुष कलाकार भजन स्पर्धेला जोडून सायंकाळी ५.३० वाजता बाल, महिला व पुरुष कलाकारांचा विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न होईल.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या पथकांनी संबंधित स्पर्धेच्या दिवशी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर पुर्वतयारीसह उपस्थित राहाणे आवश्यक असून सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा–या सर्व पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे. याची सर्व पथकांची नोंद घ्यावी. तरी भजनप्रेमी रसिकांनी तिन्हीही राज्यस्तरीय स्पर्धांना मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)